# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, बांद्रा (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९, फॅक्स : २६५५६८०५, ई -मेल : collectormsd@gmail.com


---

क्र.:सी/कार्या-७क२/कावि-५ व ६ /१९,
दिनांक :१८/०१ /२०१९.

वाचले :
१) शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील निर्णय क्र. ध्वनिप्र २००९/प्र.क्र.१२/०८/ता.क्र.१ दिनांक २२/०८/२०१७.
२) शासन, पर्यावरण विभाग यांचेकडील निर्णय क्र. ध्वनिप्र २००९/प्र.क्र.१२/०८/ता.क्र.१ दिनांक ५/०९/२०१६
३) मा.उच्च न्यायालय यांचेकडील जनहित याचिका १७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर
४) सहपोलीस उपायुक्त (का व सु), बृहन्मुंबई यांचेकडील पत्र दिनांक ५/०१/२०१९.
५) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचे ई-मेलव्दारे प्राप्त अभिप्राय दिनांक २/०१/२०१९.

**आदेश :**

ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या परिच्छेद ५(३) नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतगृहे, सभागृहे, सामूहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज इतर ठिकाणी सकाळी ०६.०० वाजेपासून रात्री १२.०० वाजेपर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम व धार्मिक कारणाकरिता करता येतो. उपोद्‌घातात नमूद शासन निर्णयांनुसार व मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये वर्षभरातील १५ दिवस कोणते ते ठरविण्याची जबाबदारी यापूर्वी राज्य शासनावर होती परंतू संदर्भ क्र.१ प्रमाणे ती आता जिल्हाधिकारी यांचेकडे सुपूर्द करणेत आली आहे. शासन निर्णय दि. २२/८/२०१७ नुसार पोलीस विभाग व ध्वनी प्राधिकरण यांचे अभिप्राय संदर्भीय पत्र क्र.४ व ५ अन्वये प्राप्त करुन सन २०१९ यावर्षी १ जानेवारी ते ३१ डिसेंबर या कालावधीतील ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचे वापराबाबत सुटीच्या १५ दिवसांपैकी १४ दिवस सकाळी ०६.०० वाजेपासून रात्री १२.०० वाजेपर्यंत ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर करणेबाबत शासन निर्णय दि.२२/८/२०१७ व्दारे मला प्रदान करणेत आलेल्या अधिकाराचा वापर करुन मी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा, सन २०१९ मधील खालील तक्त्यात नमूद दिवस निश्चित करीत आहे.

| अ.क्र. | उत्सवाचे नाव | दिनांक | वार | वेळ |
|---|---|---|---|---|
| १ | पोलीस कल्याण विभागामार्फत आयोजित 'उमंग' कार्यक्रम | २७/०१/२०१९ | रविवार | सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत |
| २ | शिवजयंती | १९/२/२०१९ | मंगळवार | |
| ३ | डॉ.आंबेडकर जयंती | १४/४/२०१९ | रविवार | |
| ४ | महाराष्ट्र दिन | ०१/०५/२०१९ | बुधवार | |
| ५ | गणेशोत्सव (दुसरा दिवस) (पाचवा दिवस व गौरी विसर्जन) | ३/०९/२०१९<br>६/०९/२०१९ | मंगळवार<br>शुक्रवार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | (दहावा दिवस)<br>(अनंत चतुर्दशी) | ७/०९/२०१९<br>१२/०९/२०१९ | शनिवार<br>गुरुवार | |
| ६ | नवरात्रोत्सव<br>(अष्टमी)<br>नवमी | <br>६/१०/२०१९<br>७/१०/२०१९ | <br>रविवार<br>सोमवार | सकाळी ०६.०० ते रात्री १२.०० वाजेपर्यंत |
| ७ | दिवाळी –लक्ष्मीपूजन | २७/१०/२०१९ | रविवार | |
| ८ | ईद-ए-मिलाद | १०/११/२०१९ | रविवार | |
| ९ | ख्रिसमस | २४/१२/२०१९ | मंगळवार | |
| १० | ३१ डिसेंबर | ३१/१२/२०१९ | मंगळवार | |
| ११ | उर्वरीत १ दिवस महत्वाचे कार्यक्रमाकरिता राखीव | | | |

उपरोक्त तक्त्यात नमूद दिनांकास मुंबई उपनगर जिल्ह्यात ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यांचा वापर, ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम २००० मध्ये नमूद ध्वनीची विहीत मर्यादा राखणेच्या अटीवर सकाळी ०६.०० वाजेपासून रात्री १२.०० वाजेपावेतो करणेबाबत परवानगी देत आहे. सदरची परवानगी केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम , २००० चे अधिन राहून देण्यात येत आहे. सदर आदेश या कार्यालयाचे mumbaisuburban.gov.in या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात आला आहे.

सही/-
(सचिन कुर्वे)
जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर

प्रत:

१) मा. पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय अग्रेषित.
२) मा.संचालक (पर्यावरण),पर्यावरण विभाग,१५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीकरिता
४) सर्व पोलीस उपायुक्त, परिमंडळ यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
५) ॲड श्री.नरेश दहिबावकर,अध्यक्ष, बृहन्मुंबई सार्वजनिक गणेशोत्सव समन्वय समिती, वीर श्रीकांत हरकर मार्ग, शहीद भगतसिंग मैदानासमोर, अभ्युदय नगर, काळाचौकी, मुंबई-३३.
६) उपप्रादेशिक अधिकारी,महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ,छत्रपती शिवाजी महाराज म्युनिसिपल मार्केट, इमारत क्र.४, माता रमाबाई आंबेडकर रोड, मुंबई -४०० ००१ यांना माहितसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी.
७) उपविभागीय अधिकारी व उपविभागीय दंडाधिकारी, (पूर्व व पश्चिम उपनगरे ) मुंबई उपनगर जिल्हा
८) तहसिलदार अंधेरी / बोरीवली / कुर्ला (मुलुंड).
९) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण मंडळ, रायकर चेंबर्स, ए विंग, २१६, २ रा मजला, मंदिराजवळ, देवनार गाव रोड, गोवंडी पूर्व, मुंबई-८८.

(शेखर घाडगे)
रजा राखीव तहसिलदार
मुंबई उपनगर

स्थळ प्रतीवर मा.जिल्हाधिकारी यांची सही असे